(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XIII / Issue – III ISSN 2277-8063

# डॉ. आंबेडकर : दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत

**डॉ. अनिता एकनाथ आंबोकर** सहाय्यक प्राध्यापक, आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, कडेपूर.

---

**प्रस्तावना**

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये मध्यप्रदेशातील महू या गावी झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील आंबवडे हे सुभेदार रामजी यांचे मूळ गाव होते. त्यांचे वडील रामजी सकपाळ हे सैन्यात सुभेदार होते. वडील रामजी व माता भीमाबाई यांच्या पोटी जन्मलेले हे चौदावे अपत्य होते. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी ते आईच्या प्रेमाला पोरके झाले. त्यांचा सांभाळ त्यांची आत्या मीराबाई हिने केला. त्यांचे मूळ आडनाव सकपाळ होते. ते माध्यमिक शाळेत शिकत असताना आंबेडकर नावाच्या शिक्षकांनी भीमरावांचे आडनाव बदलून आंबेडकर असे नाव ठेवले व हजेरीपत्रकात तशी नोंद केली. भीमराव १९०७ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. पुढे त्यांनी कठीण परिश्रम घेऊन बी. ए., एम. ए., पीएच.डी एम. एस्सी., बी. एस्सी., बार अ‍ॅट लॉ अशा पदव्या संपादन केल्या. कोलंबिया विद्यापीठाने जगातील सर्वात विद्वान विद्यार्थी म्हणून त्यांचा गौरव केला.

१९०५ मध्ये वयाच्या चौदाव्या वर्षी भीमरावांचा रमाबाईंशी विवाह झाला. हायस्कूलमध्ये इंग्रजी शिक्षण घेत असताना वाचनाचा छंद जडला होता. त्यांनी ज्ञान मिळविण्याच्या उद्देशाने अभ्यासाव्यतिरिक्त अनेक ग्रंथ वाचन केले व ते सर्व ग्रंथ आपल्याजवळ संग्रहित करून ठेवले होते. त्यातूनच स्वतःचे आदर्श ग्रंथालय निर्माण केले. त्यांना मराठी, पाली, हिंदी, गुजराती व इंग्रजी भाषा अवगत होत्या. याव्यतिरिक्त फ्रेंच, जर्मन, संस्कृत, पर्शियन या भाषासुद्धा त्यांच्या ज्ञानप्राप्तीच्या भाषा होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीभेदाविरुद्ध यशस्वीपणे मोहीम राबवली होती. भगवान गौतम बुद्ध, महात्मा फुले व छत्रपती शाहू महाराज ही त्यांची प्रमुख प्रेरणास्थाने होती. त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी व दलित समाजाच्या उद्धारासाठी महान कार्य केले. दलित समाजाचे प्रबळ व पर्यायी राजकीय संघटन असावे आणि धम्मचक्र प्रवर्तनातून एका आधुनिक व समताधिष्ठित समाजाची उभारणी होऊन सामाजिक लोकशाहीचा मार्ग प्रशस्त व्हावा हा त्यांचा मनोदय होता. दलित साहित्य हे ईश्वर, आत्मा, अध्यात्म, वर्ण आणि जातीव्यवस्था यांना नकार देते. ते हिंदू परंपरा, रुढी, वाईट चालीरीती यांच्याविरुद्ध बंड पुकारते. हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीमधून आलेला आहे. त्यांच्या सखोल अभ्यासामुळेच ते स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचे श्रेष्ठ शिल्पकार सिद्ध झाले. लोकशाही, समाजवाद आणि बुद्ध विचारप्रणाली हाच आंबेडकरी विचारांचा गाभा आहे आणि दलित साहित्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान मोठ्या प्रमाणात दिसून येते याचे कारण तेच त्यांचे अधिष्ठान आहे.

**दलित साहित्य**

दलित समाजाच्या जीवनावर अनुभवांवर आणि संघर्षांवर केंद्रित असणारा साहित्यप्रकार म्हणजे दलित साहित्य. शतकानुशतके जाती-आधारित दडपशाही आणि भेदभावाचा सामना करणारा दलित समाज हळूहळू जागृत झाला. विसाव्या शतकाच्या मध्यभागी स्वतंत्र भारतातील जाती-आधारित सामाजिक अन्याय यांच्या प्रतिसादात या चळवळीचा उगम झाला. दलित साहित्य हा शब्द १९५८ मध्ये महाराष्ट्र दलित साहित्य संघाच्या (महाराष्ट्र दलित साहित्य समाज) मुंबईतील पहिल्या परिषदेत वापरला गेला. दलित या शब्दाची व्याख्या करताना नामदेव ढसाळ म्हणतात, "दलित म्हणजे अनुसूचित जाती-जमाती, बौद्ध कष्टकरी जनता कामगार भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी." (ढसाळ, १९७५:७७) मराठी दलित लेखनाच्या इंग्रजी भाषांतरांबरोबरच दलित साहित्य भारतात मुख्य प्रवाहात येऊ लागले. १९६३ मध्ये बाबुराव बागुल यांनी 'जेव्हा मी जात चोरली' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्यामध्ये एका क्रूर समाजाचे चित्रण केले होते आणि त्यामुळे मराठीतील दलित साहित्याला एक नवीन गती मिळाली होती. मराठीत लेखन करणाऱ्या उल्लेखनीय दलित लेखकांमध्ये अरुण कांबळे, शांताबाई कांबळे, राजा ढाले, नामदेव ढसाळ, दया पवार, अण्णाभाऊ साठे, लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, शरणकुमार लिंबाळे, भाऊ पंचभाई, किशोर शांताबाई काळे, नरेंद्र जाधव, रावसाहेब दानवे यांचा समावेश आहे. १९९३ मध्ये आंबेडकरी साहित्य परिषदेने वर्धा महाराष्ट्र येथे पहिले अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संमेलन आयोजित केले होते. तसेच १९९६ मध्ये तिसरे अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संमेलन यशस्वीपणे आयोजित केले. जागृती आणि परिवर्तनासाठी अशी अनेक साहित्य संमेलने ठिकठिकाणी झाली. यामागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीच प्रेरणा होती. दलित साहित्याचा जन्म ही एक अपरिहार्य ऐतिहासिक घटना होती. अत्यंत प्रखर वास्तव दलित साहित्याच्या रूपाने अवतरले. त्यामुळे ते संवेदनशील रसिक मनाला अस्वस्थ करून गेले. दलित साहित्याच्या माध्यमातून वेदनांनी भरलेले जग समोर आले. अन्यायाचे वार अंगावर झेलत असलेला दलित समाज, त्यांच्या व्यथा, वेदना

हा दलित साहित्याचा गाभा ठरला. यातून दलित समाजावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली गेली. त्याचे पर्यावसान म्हणजे अन्याय करणाऱ्या समूहाला ती एक जबरदस्त चपराक ठरली.

**डॉ. आंबेडकर : दलित साहित्याचे प्रेरणास्रोत**

डॉ. आंबेडकरांनी दलितांना बलुतेदारी सोडून स्वतंत्र जीवन जगण्याचा उपदेश केला. दलितांच्या मनात आत्मसन्मान, आत्मविश्वास, स्वावलंबन यांची जाणीव करून दिली. परंपरा, पोथीनिष्ठता, परमेश्वरविषयक कल्पना यांना नकार देण्यास सांगितले. २० जुलै १९४२ रोजी अखिल भारतीय अस्पृश्यता परिषदेत बोलताना ते म्हणाले होते की, अस्पृश्य समाज हा हिंदूंचा भाग नसून भारताच्या राष्ट्रीय जीवननिष्ठेतील तो स्वतंत्र आणि ठळक असा एक घटक आहे व हा सिद्धांत माझ्या राजकारणाचा पाया आहे. स्वत्वाच्या पर्यायाने स्वतःच्या अस्तित्वाच्या शोधात चाचपडत असलेल्या दलित चळवळीला धर्मांतराने एक निश्चित अशी परिवर्तनाची दिशा दिली.

भारतातील तत्कालीन ताठर जातीय व्यवस्थेने अस्पृश्य व दलित समाजावर जी अनेक अमानवी स्वरूपाची बंधने लादली होती, ती बंधने झुगारून देण्यासाठीच डॉ. आंबेडकरांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचा वारसा घेऊन दलित समाज परिवर्तनासाठी विविध चळवळी सुरू केल्या. त्यांची अस्मिता जागृत केली. हजारो वर्षे जातीयतेच्या नावाखाली अज्ञान, अन्याय व अत्याचाराला बळी पडलेल्या अस्पृश्य बांधवांच्या मनात आत्मविश्वासाची भावना निर्माण करण्यासाठी आणि आपल्या हक्कांसाठी संघटितपणे लढा देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आपले सर्वस्व वेचले. ते दलित समाजात जन्माला आलेले असल्यामुळे त्यांनी अवमानित जीवन भोगलेले होते. दलितांच्या उद्धारासाठी चिकाटीने कार्य करणारे ते समाजसुधारक होते. दलित माणूस सर्वदृष्टीने परिपूर्ण कसा होईल याकडे त्यांचा कटाक्ष होता. दलितांना इतर समाजाने माणुसकीने वागवावे ही त्यांची अपेक्षा होती. शिक्षणामुळे आणि सततच्या ग्रंथ वाचनामुळे सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रातही डॉ. भीमराव आंबेडकर एक उच्चविद्याविभूषित ज्ञानी नेता म्हणून ओळखले जातात. अस्पृश्यता हा गुलामीचाच एक प्रकार आहे असे ते मानत असत. म्हणून त्यांनी अस्पृश्य वर्गातील आत्मसन्मान जागृत केला. वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था यांचा शोध आपल्या विविध ग्रंथातून घेतला. दलित-शोषितांची मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी सांस्कृतिक क्रांतीची अत्यंत गरज आहे. या सांस्कृतिक क्रांतीची पूर्वतयारी डॉ. आंबेडकरांच्या विविध चळवळीतून आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळे झाल्याचे दिसून येते. त्यांनी मराठीतून जे निबंध लेखन केले ते प्रामुख्याने मूकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत या दलित वर्गांचे प्रबोधन करण्यासाठी अवतरलेल्या नियतकालिकातून केले. त्यांनी 'मूकनायक'चा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० रोजी प्रसिद्ध केला. १९२४ मध्ये त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' या ब्रीदवाक्यापासून त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. १९२३ मध्ये मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, विद्यालय इत्यादी ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये असा ठराव मंजूर करून घेतला होता; परंतु स्पृश्य समाजाच्या भीतीने अस्पृश्यांनी त्या तलावाचे पाणी नेण्याचा हक्क बजावला नव्हता. त्यामुळेच १९ व २० मार्च १९२७ ला डॉ. आंबेडकरांनी महाड येथे परिषद घेण्याचे ठरविले व कार्यकर्त्यांसह त्यांनी चवदार तळ्याचे पाणी ग्रहण केले. २० मार्च १९२७ हा दिवस माणुसकीचा व समतेचा संदेश देणारा दिवस होता.

१९३० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून चळवळ उभारली. रामनवमीच्या दिवशी अनेक अस्पृश्यांनी या मंदिरात प्रवेश केला. नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाचा परिणाम दलित मुक्ती आंदोलनाच्या प्रगतीस हातभार लावणारा ठरला. अस्पृश्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव झाली. त्यांनी दलितांना अन्याय विरुद्ध लढा देण्याची दिशा दाखविली. राखीव जागांवर आपल्या दलित बांधवांना राजकीय हक्क मिळवून दिले. त्यांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधानसभेत महारांच्या वतनासाठी कायद्यात दुरुस्त्या सुचविल्या. ते स्वतः निर्भीड व ध्येयवादी पत्रकार होते. त्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून हिंदू धर्मग्रंथ, जातीव्यवस्था, मनुस्मृती, ब्राह्मणशाहीवर टीका केली. वृत्तपत्रीय लिखाणातून त्यांनी अस्पृश्य समाजाला विचारप्रवृत्त केले व अंतर्मुख बनविले. आंबेडकरांनी दलितांना शिक्षण, शिक्षणातून संघटन व संघटनातून स्वतःच्या हक्कांसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. ते स्वतः साहित्य लेखनाबाबत दक्ष असत. समाजजीवन व राष्ट्रजीवन प्रगत होणारे साहित्यशास्त्र निर्माण होत नाही, ते व्हावे तसेच दीन-दलितांचे वास्तव, त्यांचे अनुभवविश्व साहित्याद्वारे समाजापर्यंत पोहोचावे असे त्यांना वाटत होते. यामुळेच २ मे १९५४ रोजी नागपूर येथील विदर्भ साहित्य संघात बोलताना ते म्हणाले, ''मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचं आहे की, उदात्त जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये आपण साहित्य प्रकारातून आविष्कार करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली नाती चार भिंतीपुरती ठेऊ नका. तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या

प्रश्नांपुरतीच बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचे, दलितांचे फार मोठे जग आहे हे विसरू नका. त्यांचे दुःख, त्यांची व्यथा नीट समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यासाठी खरी मानवता आहे."(आंबेडकर,२०१६:१५२) त्यांनी साहित्यिकांनाही आपल्या भूमिकेची जाणीव करून देत समाज हितासाठी अपेक्षित असलेल्या सर्वांगीण बाबींचे साहित्यातून वास्तव शब्दचित्रण होणे अपेक्षित असल्याचे सांगितले. त्यांच्या मते चातुर्वर्ण्यव्यवस्था ही सामाजिक विषमतेचे मूळ कारण आहे. जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी चातुर्वर्णीय व्यवस्था नाहीशी करणे क्रमप्राप्त आहे असे मानून त्यांनी दलित समाजामध्ये जाणीव जागृती निर्माण केली. दलितांवरील अन्याय दूर करावयाचा असल्यास विद्येचा प्रवाह दलित समाजाच्या घरोघरी पोहोचविला पाहिजे या दृष्टीने डॉ. आंबेडकर यांनी समाजकारण व राजकारण याबरोबरच शैक्षणिक कार्य केले. त्यांनी अस्पृश्य समाजासाठी १९२८ मध्ये 'अस्पृश्य समाज शिक्षण संस्था' स्थापन केली. १९४६ मध्ये 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' नावाची संस्था काढली. या संस्थेमधूनच पुढे 'सिद्धार्थ कॉलेज' व 'मिलिंद महाविद्यालय' सुरू केले.

लेखक अनिल कांबळे म्हणतात, "बाबासाहेबांच्या मते अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणाराच जास्त गुन्हेगार असतो. आपल्याला जर हक्क हवे असतील तर ते मागून मिळत नाहीत. त्यासाठी संघर्ष करावाच लागतो, या विचारधारेवर त्यांचा विश्वास होता. म्हणून बाबासाहेबांनी आपल्या समाजाला हक्क मिळवून देण्यासाठी संघर्षाचा मार्ग स्वीकारला; पण हा संघर्ष सनदशीर सत्याग्रहाच्या मार्गाने करण्याचे त्यांनी ठरविले."(कांबळे,२०१६:३७)

डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरित होऊन अन्याय, अत्याचार, उपासमार इत्यादीच्या अंधारात जो दलित समाज पिचला जात आहे, त्यांच्या व्यथा दलित साहित्यातून मांडल्या जाऊ लागल्या. दलित लेखक, कवींनी या अत्याचाराला, अन्यायाला साहित्याच्या माध्यमातून वाचा फोडलेली दिसून येते. या सर्वांचे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत. दलित साहित्यातून वर्षानुवर्षे दबलेला, दडपला गेलेला आवाज साहित्यसृष्टीत घुमू लागला. अनेक कवी, लेखक दलित साहित्यातून मुक्तपणे दलितांच्या व्यथा शब्दबद्ध करू लागले.

कवी वामन निंबाळकर म्हणतात, "बाबासाहेब, हे महापुरुषा!

मी फक्त तुलाच महापुरुष म्हणतो, कारण
इथल्या मुक्यांच्या तोंडी तू
क्रांतीगीताचे धुंद स्वर दिले
त्यांना मुखर केले
त्यांच्या अंधारवाटांवर सूर्याचे रोपण केले."(फडके,१९८९:१८३)

खरोखरच डॉ. आंबेडकरांनी हजारो वर्षे अपमानित जिणे जगणाऱ्या समाजाला गुलामगिरीविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांनी प्रभावित होऊन लहू कानडे आपल्या 'भीमराव, तू एक माणूस होतास' या कवितेत लिहितात,

"ज्यांना शिकवलं होतं फक्त मेलेली गुरं ओढणं
ज्यांच्या भारी बांधलं होतं दुसऱ्याचं शेण काढणं
ज्यांच्यावर लादलं होतं उपाशीपोटी दगड फोडणे
ज्यांच्या हातांना माहीत होतं कातड्याला कातडं जोडणं
त्या बोटांना तू कलावंत करून गेलास!" (फडके, १९८९:२११)

डॉ. आंबेडकरांनी दलित समाजाला जी जीवनदृष्टी दिली, त्याचा प्रभाव दलित साहित्यिकांच्या लेखनशैलीत दिसून येतो.

दलित जाणीव म्हणजे दलित जीवनाच्या परिवर्तनाचा विचार होय. प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणींचे पक्षी', दया पवार यांचे 'बलुतं', माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोष्ट देवाचे गोठणे', लक्ष्मण माने यांचे 'उपरा', उत्तम बंडू तुपे यांचे 'काट्यावरची पोटं', शरणकुमार लिंबाळे यांच्या 'अक्करमाशी' व 'बारामाशी', दादासाहेब मोरे यांचं 'गबाळं', लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', भीमराव गस्ती यांचे 'बेरड', शंकरराव खरात यांचे 'तराळ- अंतराळ', किशोर शांताबाई काळे यांचे 'कोल्हाट्याचं पोर', बेबी कांबळे यांचे 'जीणं आमचं' या दलित आत्मकथनातून दलितांचे अनुभव विश्व, त्यांच्या जीवन-जाणिवा स्पष्ट होतात. डॉ. आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावित होऊन नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरची स्थापना केली व दलितांचे विविध प्रश्न सोडविले. दलित साहित्यात दलित कादंबरी, दलित कथा, दलित कविता, दलित नाटक, दलित पथनाट्य असे साहित्यविषयक प्रवाह निर्माण झाले. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतून, त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळे सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाची दिशा निर्देशित केली गेली. त्यांचे विचार जनसामान्यांना पटवून देण्यासाठी अनेकांनी दलित साहित्य चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न केले.

लेखक चंद्रशेखर रामटेके यांनी नागपूर दलित रंगभूमीद्वारे नाट्य शिबिरे आयोजित केली. 'माझी सांस्कृतिक यात्रा' या लेखात नाट्य शिबिराचा उद्देश स्पष्ट करताना चंद्रशेखर रामटेके म्हणतात, ''जातिभेदाच्या शृंखला तोडल्यानंतर डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली समाजरचना प्रस्थापनेसाठी क्रांतीलढ्याचे नेतृत्व समाजातील तरुण वर्गाच्या खांद्यावर येऊन पडले. हे जाणून समता संग्रामात शत्रू पक्षावर विजय मिळवण्यासाठी आंबेडकरी विचारांची शस्त्रे युवक-युवतीने चळवळीतील राबणाऱ्या प्रत्येक कलावंत कार्यकर्त्यांनी आत्मसात करणे ही त्यांची नैतिक जबाबदारी असते. दलित साहित्य, दलित साहित्य संमेलन, दलित नाट्य संमेलन, नाट्य शिबिर, चर्चा,. परिसंवाद हे विचार पेरण्याचे माध्यम असू शकते, पण दलित रंगभूमीचा कलावंत कार्यकर्ता घडविण्यासाठी सातत्याने समता, स्वातंत्र्य, बंधुता या आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या विचारांचे प्रहार शिक्षणार्थी विद्यार्थ्यांवर होणे अत्यावश्यक आहे. आम्हास कलावंत पाहिजे जो विचारांनी पेटला असेल, दुसऱ्यास पेटवणार असेल, प्रसंगी तो सडकेवरील आंदोलनात देखील कृतिशील, वैचारिक अभिनय, भूमिका निभावणारा असेल. हे ध्येय उराशी बाळगून आम्ही प्रशिक्षण शिबिराचा वैचारिक प्रवास सातत्याने सुरू ठेवला आहे.''(लिंबाळे, १९९१:२७५)

दलित समाजालाही सामान्य जीवन जगता यावे यासाठी दलितांच्या मनात स्वत्वाची जाणीव निर्माण करून त्यांची अस्मिता जागृत केली. जन्मजात अस्पृश्यतेमुळे दलितांच्या जीवनात दैन्य, दास्य, दारिद्र्य आले. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व धार्मिक जीवनात त्यांची कोंडी झाली. माणूस असूनही पशुपेक्षा निकृष्ट दर्जाचे जीवन त्यांच्या वाट्याला आले. दलित समाज शिकून संघटित झाला पाहिजे व अन्याय, अत्याचाराविरुद्ध त्याने संघर्ष केला पाहिजे, यासाठी सतत उद्बोधन करीत राहिले. याचा परिणाम दलित साहित्य चळवळीने वेग घेतला. गं. बा. ग्रामोपाध्ये म्हणतात, "यंत्रकुशल युगातही मनुप्रणित सनातनी समाज व्यवस्थेचा जाच असह्य होत असूनही दलित समाजाची अस्मिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जागृत केल्यामुळे दलितात प्रखर विद्रोही वृत्ती निर्माण होत आहे. चीड, संताप, बंडखोरी ही या प्रवृत्तीची काही लक्षणे आहेत. या वृत्तीचा कलात्मक आविष्कार म्हणजे आजचे दलित साहित्य.''(गायकवाड, १९९४:१४)

दलितेतरांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध दलितांनी संघर्ष करावा. न्याय मिळवून घेण्यासाठी जाचक समाज व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करावा. आपल्यावर हे अवमानकारक जगणे लादले आहे याविरुद्ध दलितांनी बंड करून उठावे अशा प्रकारची शिकवण त्यांनी दलित वर्गीयांना दिली. या विचारधारेचे चित्रणही दलित साहित्यातून होत असलेले आपणास पाहावयास मिळते. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन योगीराज वाघमारे, प्र. ई. सोनकांबळे, शंकरराव खरात, बंधू माधव, सुखराम हिवराळे, अविनाश डोळस अशा लेखकांनी दलित जीवनाचे चित्रण केले व दलितांच्या दुःखाला वाचा फोडली समाजातील विषमता साहित्याच्या माध्यमातून समाजासमोर मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे दलित समाजात होणाऱ्या बदलांचे चित्रण दलित साहित्यातून होऊ लागले. ग्रामीण भागातील अस्पृश्यांच्या जीवनातील दुःख, दैन्य, अज्ञान, अस्पृश्यांकडे बघण्याची समाजातील लोकांची तुच्छतापूर्वक दृष्टी व त्यांच्या शिकवणुकीमुळे दलितांमध्ये येणारी जाण इत्यादी बाबतचे चित्रण कथात्मक साहित्यातून व्यक्त होताना दिसते.

बाबुराव बागुल, केशव मेश्राम, योगीराज वाघमारे यांच्या काही कथातून दलितांतर्गत ताणतणावांचे व कुटुंबातील नातेसंबंधांचे थोड्याफार प्रमाणात चित्रण झालेले आढळते. बंधू माधव व बाबुराव बागुल यांच्या लेखनातून काही प्रमाणात वर्गीय जाणिवा डोकावल्या असल्या तरी त्यात आंबेडकरी विचारांचा अधिक वाटा असल्याचे दिसून येते. यादृष्टीने आर्थिक व सामाजिक बाबतीत केल्या गेलेल्या दलित माणसांच्या जीवनाचे चित्रण त्यांच्या कथेत प्रामुख्याने येते. शंकराव खरात यांच्या लेखनात त्यांनी समाजशिक्षकाची भूमिका घेतल्याचे दिसून येते. दलितांच्या जीवनातील अज्ञान, दारिद्र्य, दुःख, रुढी व परंपरा या बाबी नाहीशा करण्यासाठी काय करावे याचे दिग्दर्शन शंकराव खरात यांच्या कथेतील व्यक्तिरेखांतून दिसून येते.

दलित समाजातील अन्याय-अत्याचाराचे चित्रण करण्यासाठी दलित समाजातील साहित्यिक पुढे आले; परंतु त्याचबरोबर दलितेतर साहित्यिकांनीही दलित साहित्यातून दलितांचे भावविश्व उलगडण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबुराव गायकवाड म्हणतात, "अस्पृश्यतेबरोबरच दलितांच्या वाट्याला दारिद्र्य आलेले असल्यामुळे होणाऱ्या हालअपेष्टा, उपासमार व त्यामुळे त्यांची जीवनाची झालेली परवड हेही दलितेतर लेखकांना भोगावे लागले नसल्यामुळे व दलितांच्या दारिद्र्याच्या दाहकपणाची प्रत्यक्ष अनुभूती त्यांना नसते. त्यामुळे दुरून दिसणाऱ्या दारिद्र्याचे ते चित्रण करू शकले तरी त्यामुळे मानसिक पातळीवर दलित ज्या वेदना अनुभवतात त्याचे चित्रण हे लेखक फारसे करू शकत नाहीत असे म्हणावे लागते.''(गायकवाड, १९९४:२५३) अशिक्षित व अज्ञानी अशा दलित वर्गीय माणसांना माणुसकीची जाणीव निर्माण व्हावी. इतरांसारखेच आपण माणूस आहोत म्हणून परंपरेने लाभलेली हीन कामे करण्याचे दलितांनी टाळावे. उच्चवर्गीयांची लाचारी

पत्करून आपले स्वत्व गमावलेले जिणे दलितांनी जगू नये, अशा प्रकारच्या प्रबोधनाच्या दृष्टिकोनातून दलितांच्या जीवनाचे चित्रण झालेले बाबुराव बागुल, बंधू माधव, योगीराज वाघमारे व अविनाश डोळस इत्यादींच्या कथातून पहावयास मिळते.

**उपसंहार**

दलित साहित्यातून दलित समाजाच्या जाणिवा चित्रित होतात. दलित समाजाच्या दारिद्र्याचे, अवमानित जगण्याचे, प्रक्षोभ व विद्रोहाचे चित्रण होते. दलित साहित्यातून प्रबोधनाची दृष्टी चित्रित होते. दलित साहित्य निर्मितीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा दिसून येते. त्यांची दलित समाजाप्रती असलेली आत्मीयता, चिंता व तळमळ दिसून येते. त्यांच्या वैचारिक प्रभावामुळे अनेक दलित साहित्यिकांकडून उत्तम साहित्य निर्मिती झाल्याचे व होत असल्याचे दिसते. दलित समाज परिवर्तनासाठी त्यांचे विचार प्रेरक व मार्गदर्शक ठरतात. दलित साहित्यामध्ये दलित कथा, दलित कादंबरी, दलित कविता, दलित नाटके असे विविध प्रवाह असून त्यांमध्ये डॉ. आंबेडकर विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. दलित साहित्यातून प्रकट होणारी ही वरील प्रकारची वैशिष्ट्ये पाहिल्यानंतर दलित लेखकांनी केलेल्या दलित जीवनाच्या चित्रणामागे प्रामुख्याने आंबेडकरी प्रेरणा आहे, असे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ –**

- आंबेडकर बाबासाहेब(२०१६) : माझी आत्मकथा, ज्ञानसंवर्धन प्रकाशन, कोल्हापूर,(पुनर्मुद्रण).
- आंबेडकर भीमराव(१९४०) : मूकनायक.
- ढसाळ नामदेव(१९७५) : माय मराठी.
- गायकवाड बाबुराव(१९९४) : दलितेतर लेखक आणि दलित जीवन,अधिका प्रकाशन, पुणे.
- गायकवाड ज्ञानराज(२०१६):महामानव-डॉ. भीमराव रामजी आंबेडकर,रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.
- लिंबाळे शरणकुमार(१९९१) : दलित चळवळ, राजहंस प्रिंटिग प्रेस,कोल्हापूर.
- फडके भालचंद्र (१९८९):डॉक्टर आंबेडकर आणि दलित साहित्य, कोल्हापूर.
- फडके भालचंद्र(१९८९):डॉक्टर आंबेडकर आणि दलित साहित्य, कोल्हापूर.